*Shri Gurukrupa Shikshan Prasarak Mandal,s*

# Smt. Vimladevi Ayurvedic Medical College & Hospital

Village : Wandhari, Ghughus Road
Chandrapur - 442 406
Fax No. : (07172) 274779
Email : vimladeviayurved@gmail.com

**Postal Address :** New Post Box No. 33,
Main GPO, Near Water Tank,
Chandrapur - 442 401
**Ph. No. : 9552173366 / 9552083366**

*Ref. No. :* SVAMC OW No. 1235 Date 19/08/23

*Date :* 19/08/2023

प्रति,
मा. संचालक विद्यार्थी कल्याण
महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ,
नाशिक.

विषय :– बहि:शाल शिक्षण मंडळ योजनेबाबत......

संदर्भ :– 1) विद्यापीठ पत्र क्र. मआविवि / एसडब्ल्यू / स्कीम / 970 / 2023 दि. 01 / 06 / 2023
1) विद्यापीठ पत्र क्र. मआविवि / एसडब्ल्यू / स्कीम / 1297 / 2023 दि. 07 / 08 / 2023

महोदय / महोदया,

आपल्या विद्यापीठाच्या शैक्षणिक वर्ष 2023–24 करीता बहि:शाल शिक्षण मंडळ योजनेत आम्ही सहभागी होण्यास इच्छूक असून कृपया या योजनेत सहभागी करुन घ्यावे ही नम्र विनंती.

सदर योजनेअंतर्गत आम्हाला अनुदान मंजुर झाल्यास योजनेच्या सर्व अटी व शर्तीचे पालन करण्यास आमची तयारी आहे. त्याचप्रमाणे योजनेसाठी आलेल्या खर्चाचा ताळेबंद, लेखा परिक्षण अहवाल व कार्यक्रमाचा वृतांत विद्यापीठास विहित मूदतीत पाठविण्यात येईल असे लिहून देतो.

**Bank Details**

| | |
|---|---|
| Name of Bank | **State Bank of India** |
| Bank Account No. | **31564488846** |
| IFSC Code | **SBIN0007676** |
| Name of Account Holder | **Smt. Vimladevi Ayurvedic Medical College & Hospital** |
| Name of Branch | **Forest Camp MIDC Chandrapur** |
| MICR Code | **442002008** |

धन्यवाद !

संपर्क प्रतिनिधी

डॉ. अखिलेश देशमुख,
मो.नं. 9226420378

Principal
Smt. Vimladevi Ayurvedic Medical College & Hospital, Chandrapur

प्राचार्या
श्रीमती विमलादेवी आयुर्वेदीक मेडीकल
कॉलेज अॅन्ड हॉस्पिटल वांढरी, चंद्रपूर

महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक
Maharashtra University of Health Sciences, Nashik
वणी - दिंडोरी रोड, म्हसरुळ, नाशिक - ४२२००४.
Vani – Dindori Road, Mhasrul, Nashik – 422 004.
EPABX : 0253-2539100-300, Phone : 0253-2539170, 73
E-mail : sw@muhs.ac.in Web.:www.muhs.ac.in

डॉ. मनोजकुमार बी.मोरे
एम.डी. (आयुर्वेद)
संचालक, विद्यार्थी कल्याण

Dr.Manojkumar B. More
M.D. (Ayurved)
Director, Student Welfare

मआविवि/एसडब्ल्यू/स्किम/९७०/२०२३ दि.०१/०६/२०२३

"परिपत्रक क्र.१८/२०२३"

प्रति,
मा. अधिष्ठाता/प्राचार्य
सर्व संलग्नित महाविद्यालये,
म. आ. वि. वि. नाशिक.

विषय : बहि:शाल शिक्षण मंडळ योजनेबाबत...

महोदय/ महोदया,

विद्यार्थ्यांच्या सर्वांगिण व्यक्तीमत्व विकासासाठी विद्यापीठाच्या विविध उपक्रमांच्या माध्यमातून सतत प्रयत्न केले जात आहेत. आरोग्य विज्ञान अभ्यासक्रमाचा विद्यार्थी मुळातच हुशार समजला जातो. मात्र आर्थिक किंवा सामाजिक अडचणीमुळे त्याला उच्च शिक्षणात अडचणी येवू नयेत यासाठी विद्यापीठाच्या विद्यार्थी कल्याण विभागामार्फत विद्यार्थ्यांच्या हितासाठी विविध कल्याणकारी योजना सुरु केल्या आहेत. याच उपक्रमाचा एक भाग म्हणून विषयांकीत योजना विद्यापीठाच्या विद्यार्थी कल्याण विभागामार्फत राबविण्यात येत आहेत. शैक्षणिक वर्ष २०२३-२४ करीता बहि:शाल शिक्षण मंडळ योजनेकरीता विद्यापीठाशी संलग्नित असलेल्या महाविद्यालयांचे प्रस्ताव/अर्ज दि. १४/०७/२०२३ पर्यत मागविण्यात येत आहे. सदर योजनांची माहिती या परीपत्रकासोबत जोडून पाठवित आहोत.

विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण व्यक्तीमत्व विकासाला चालना देण्याकरीता महाविद्यालयबाह्य उपक्रमांमध्ये सामाजिक कार्य घडवून आणणे व महाविद्यालय परिसरातील जनतेच्या सामाजिक जाणीवा सजग करुन जनजागृती निर्माण करण्याच्या दृष्टीने या सामाजिक जबाबदारीमध्ये विद्यापीठाचा थोडाफार हातभार असावा या हेतूने विद्यापीठाने सदर योजना सुरु केली आहे. त्यासाठी देण्यात येणारे अनुदानाकडे खर्चाची प्रतीपूर्ती म्हणून न पाहता सामाजिक बांधीलकी म्हणून पहावे असे अपेक्षित आहे. त्यामूळे प्राप्त अनुदानाचा विनियोग हा फक्त कार्यक्रम घेणे असा न ठेवता समाज जागृती व नवनिर्मितीच्या कामात आपला सहभाग असावा या उदात्त हेतूने या उपक्रमात भाग घ्यावा व सदर योजनेच्या अटी व शर्तीच्या आधीन राहून योजना राबवावी.

Principal
Smt. Vimladevi Ayurvedic Medical
College & Hospital, Chandrapur

बहि:शाल शिक्षण मंडळ योजनेसाठी विद्यापीठाकडून रु. १०,०००/- अनुदान देण्यात येते. अनुदानाचे ऑडीट करण्यासाठी महाविद्यालयांना एकरकमी रु. ५००/- ऑडीट फी म्हणून देण्यात येईल. बहि:शाल शिक्षण मंडळ योजनेचे अनुदान महाविद्यालयात प्राप्त झाल्यानंतर एक महिन्याच्या आत कार्यक्रमांचे आयोजन करणे आवश्यक असेल. तसेच योजना राबविल्यानंतर १ महिन्याच्या आत प्रस्ताव समायोजनासाठी विद्यापीठास पाठविणे बंधनकारक राहील. विद्यापीठाने दरवर्षी केलेल्या अर्थसंकल्पीय तरतुदी नुसार अनुदान वाटप करण्यात येईल.

बहि:शाल शिक्षण मंडळ हा निव्वळ महाविद्यालयबाहय व्यक्तीमत्व विकासाचा उपक्रम न राहता समाज जागृती व नवनिर्माणाची चळवळ सुरु व्हावी या करीता आहे. सदर योजनेत सहभागी व्हावयाचे असल्यास योजनेचे अनुदान मिळण्यासाठी आपला प्रस्ताव नमुद केल्याप्रमाणे विहित नमुन्यात (सहपत्र "अ") विद्यापीठाकडे पाठवावा.

ई-मेलद्वारे प्राप्त झालेले तसेच निर्धारित वेळेत प्राप्त न झालेले प्रस्ताव/अर्ज/कागदपत्रे ग्राहय धरण्यात येणार नाहीत. योजना संबंधीचे सर्व दस्ताऐवज विद्यार्थी कल्याण विभागात परस्पर स्वीकारले जाणार नाहीत याची कृपया नोंद घ्यावी.

शैक्षणिक वर्ष २०२३-२४ पासुन महाविद्यालयाने खालील नमुद केलेल्या सुचना प्रमाणे ऑनलाईन पध्दतीने अर्ज करावयाचा आहे. सद्यस्थितीत हार्डकॉपी मध्ये अर्ज व ऑनलाईन पध्दतीने अर्ज करावयाचा आहे तसेच अर्जाची हार्ड कॉपी देखील विद्यापीठाकडे सादर करावायाची आहे. ऑनलाईन पध्दतीने अर्ज करण्याची कार्यपध्दती खाली नमुद केलेली आहे.

वर नमुद केलेल्या योजनेच्या अटी व शर्तीमध्ये बदल करण्याचे सर्व हक्क विद्यापीठाकडे राखुन ठेवण्यात आले आहेत.

धन्यवाद !

**Sd/-**
संचालक
विद्यार्थी कल्याण

प्रत माहितीस्तव : १) मा. कुलगुरु कार्यालय, मआविवि, नाशिक

२) मा. कुलसचिव कार्यालय, मआविवि, नाशिक

३) मा. वित्त व लेखा अधिकारी, मआविवि, नाशिक

४) सर्व विभाग प्रमुख, मआविवि, नाशिक

Principal
Smt. Vimladevi Ayurvedic Medical College & Hospital, Chandrapur

टिप :